# हिंसा - आतली आणि बाहेरची

▶ पुरन्दरे चन्द्रशेखर

## प्रस्तावना

हिंसा घरात असते, दारात असते, देशांतर्गत असते, देशाच्या सीमेवरही असते. तिचे स्वरूप प्रत्येक ठिकाणी बदलत असते. त्यामुळे तिचे तात्त्विक विवेचन तितकेच लवचिक असणे आवश्यक असते, तर त्या विवेचनातून उपाययोजनेसाठी काही निश्चित दिशा मिळणे शक्य असते. अर्थात तशी दिशा मिळूनही आर्थिक, सामाजिक, राजकीय, सत्तापिपासू हितसंबंध त्या दिशेने चिकाटीने प्रामाणिक प्रयत्न करतील हे त्यांचे आजवरचे कर्तृत्व पहाता असंभव वाटते. तरीही हिंसेचे आपले आकलन वारंवार तपासणे आवश्यक आहे.



*login not required for dreams*
*स्वप्ने पहायला लॉगिनची जरूरी नाही.*
*(microsoft, twitter, amazon ने एका स्त्रीचा खून)*

**सामाजिक शास्त्रे**

सामान्यतः राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र वगैरेंच्या अभ्यासात एखादा घटक केंद्रस्थानी ठेवून हिंसेचे विश्लेषण केले जाते. असे काही घटक म्हणजे सत्तेसाठी स्पर्धा, स्त्री-पुरुष भेद, आर्थिक वर्ग, जात, धर्म वगैरे. माणसाचे नैसर्गिक शरीर, मन, त्याचा मानवी भवताल आणि सोशल मीडिया यांचे त्या घटकावर होणारे परिणाम यात हिंसेचे उत्तर शोधले जाते. त्यामुळे अगदी व्याख्येनेच असे अभ्यास एकरेषीय रहातात. उदा. मानसशास्त्रीय अभ्यासाचा भर मानवी मनाच्या व्यवहारांवर असतो. 'भडकाऊ' भाषणाने समाजात हिंसा वाढवणारे राजकीय नेतृत्व सगळीकडे असते. अशा नेत्याच्या वक्तव्यांचा खुलासा त्याच्या बालपणात, त्याच्या वैयक्तिक भूतकाळात, त्याच्या मानसिक जडणघडणीत शोधला जातो. समाजशास्त्र त्याची जात, आर्थिक वर्ग, तो पुरुष आहे ना इत्यादींचा परामर्श घेऊन 'तो तसेच बोलणार' असा निरुपयोगी निष्कर्ष काढते. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-संस्था व व्यक्ती-व्यवस्था यांच्यातील संबंधांचा एकत्रित अभ्यास झाला तरच हिंसेचा सर्वंकष खुलासा होऊ शकतो व त्या प्रश्नावर सामाजिक उपायोजना आखता येते. एरवी हा किरकोळ स्थानिक मलमपट्टीचा शोध ठरतो.

उदा. बृहत् समाजात जर व्यक्तीला हिंसेपासून परावृत्त करणाऱ्या शक्ती किंवा सांस्कृतिक घटक असतील, तर घरगुती हिंसाचार कमी होतो. अशा बाह्य नियंत्रक घटकांचा अभ्यास झालेला आहे. त्यातील एका अभ्यासानुसार काही समाज 'विकसित' असतात. म्हणजे तेथे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था असते व वर्गव्यवस्था जवळजवळ अभेद्य असते. अशा समाजात लहान मुलांना घरात आणि बाहेर सतत नियंत्रणात ठेवले जाते. आज्ञाधारकपणा, मुख्य प्रवाहाशी जुळवून घेण्यावर भर दिला जातो. ज्येष्ठतेचा अधिकार आणि शिक्षा - म्हणजे हिंसा यांच्या मार्गे ही मूल्ये लहान मुलांवर बिंबवली जातात. अशा

नियंत्रणाचे एक कारण असे असावे की कुटुंब आणि समाजासमोर औद्योगिक उत्पादनाचे किंवा मोठ्या बँका, कंपन्यांचे प्रारूप असते. कारखान्यात किंवा अशा संस्थांमध्ये कोणी काय करायचे हे अचूक ठरलेले असते व त्याप्रमाणेच व्यक्तीला वागावे लागते.

याउलट 'अविकसित' जगात मुलांना अधिक स्वातंत्र्य असते, आत्मनिर्भरतेवर भर असतो. वरिष्ठांची देखरेख कमी असते आणि शिक्षेची वेळ येत नाही.

दुसऱ्या एका विचारप्रणालीनुसार बहुधा घरात पुरुषाकडे सत्ता असते. पैसा, मालमत्ता, प्रतिष्ठा, शारीरिक ताकद या सगळ्यात तो इतर कुटुंबियांपेक्षा वरचढ असतो. तो बायकोची आणि मुलांची मारहाण वाटेल तेव्हा करू शकतो कारण त्याला या हिंसेची शिक्षा नसते. बाहेरून समाजाचा दबाव असला तर ही हिंसा बरीच कमी होते.

अशा अनेक 'आजारी' व्यक्तींचा मानसशास्त्रीय, वैद्यकीय अभ्यास झालेला आहे. त्याचे निष्कर्ष खोलात व सविस्तर पहाण्याची जरूरी नाही पण त्यांचा रोख साधारणतः अशा हिंसक माणसात काही रासायनिक संतुलन बिघडलेले असते, त्याला न्यूनगंड असतो, वगैरे.

तसेच, बहुतेक तात्त्विक अभ्यासांमागे मानवी स्वभाव आणि हिंसा यांच्यातील संबंध दोन विरुद्ध दृष्टींनी पाहिले जातात. एक दृष्टी म्हणजे मानव हा मूलतःच हिंसक असतो. एवढेसे कारण त्याला हिंसक व्हायला पुरेसे असते. म्हणजे हिंसा आत असतेच, ती फक्त बाहेर यायला निमित्त शोधत असते. विरोधी विचारानुसार माणूस मूलतः स्थितीप्रिय असतो. समाजाला जी मूल्ये महत्त्वाची असतात, त्यानुसार तो वागतो. ती संस्कृती, ते वातावरण जर हिंसाचाराचे असेल, तर तो हिंसक बनतो. जगातील हिंसाग्रस्त देशांत शालेय वयाच्या मुलांपासून तरुण वर्गात हा कल आढळतो. जर वातावरण हिंसेला पोषक नसेल तर माणसाला हिंसेला प्रवृत्त करायला बाहेरचा मोठा प्रयत्न लागतो. आतंकवाद्यांच्या संदर्भात हे निरीक्षण लागू पडते. म्हणजे, माणूस हिंसकच असतो या गृहीतावर 'तो तसाच वागणार' हा निष्कर्ष निघतो तर दुसऱ्या गृहीतावर, हिंसा ही अनैसर्गिक क्रिया ठरते, ती मानवी स्वभावानुसार नसते.

मानव्यशास्त्रानुसार (त्यात उपरिनिर्दिष्ट सगळी शास्त्रे आली) माणसाचा किंवा समूहाचा स्वतःवरील ताबा गेला किंवा कमी पडला, तर हिंसा होते. (यात वरच्या दुसऱ्या प्रतिपादनाच्या गृहीतानुषंगाने निवडीचे स्वातंत्र्य असले तर माणूस हिंसा करणार नाही.)

**नवीन विचार**

आधीच्या विचारांच्या त्रुटी लक्षात घेऊन आता विचार




*(man), swan and a machine*
*हा हंत हंत नलिनीम् गज उज्जहार।*

निराळ्या दिशेने होत आहे. यासाठी व्यक्तीच्या आयुष्याकडे दोन प्रकारे बघितले जाते. प्रसंग आणि प्रक्रिया. प्रसंग निश्चित तारखेला घडले असे सांगता येते. उदा. पहिल्या नोकरीची सुरुवात, विवाह, मुलांचे जन्म, वगैरे. प्रक्रिया सतत चालू असतात. त्या बहुधा व्यक्तीच्या नियंत्रणाबाहेरच्या संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक असतात. उदा. युद्ध सुरू झाले, बँकेने व्याजदर वाढवला, सरकारने नवीन योजनेत काही वर्गांना सवलत जाहीर केली, वगैरे. या निर्णयांची तारीख सांगता येईल पण त्यांनी दीर्घकालीन प्रक्रिया सुरू होतात. त्यांचा व्यक्तीवर होणारा परिणाम त्या त्या वेळी निराळा होतो. आधीच्या अशा आश्चर्यजनक प्रक्रियेला व्यक्ती कशी सामोरी गेली, त्यावर तिचा नवीन प्रक्रियेचा प्रतिसाद ठरतो.

हा मुद्दा स्पष्ट करणारा एक अभ्यास पाहू.

बरीचशी १२-१९ वयोगटातील मुले काही ना काही असामाजिक कृत्ये करत असली तरी त्यातील फक्त ३ ते ९ टक्के प्रौढावस्थेतही समाजविघातक, प्रसंगी हिंसक कृत्ये करत रहातात. या व्यक्तींच्या अभ्यासात असे आढळून आले की चवथ्या वर्षी ही मुले इतरांना चावत असत, दहाव्या वर्षी दुकानातून वस्तू पळवणे आणि शाळा बुडवणे सुरू होत असे, एकोणिसाव्या वर्षी अमली पदार्थांचा वापर होत असे तर मुलगे २२ व्या वर्षी पहिला बलात्कार करत असत. नंतर तिशीत बायकोला मारणे, मुलांचे हाल करणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे, भुरट्या चोऱ्या मग दरोडेखोरी, दारू पिऊन वाहन चालवणे, कामावर अफरातफर करणे, इत्यादी. म्हणजे, सभोवतालच्या परिस्थितीतील संधी बदलल्या की त्यांचा प्रतिसाद बदलतो. वैद्यक व मानसशास्त्राच्या मते अशा मुलांचा विकार बऱ्याच वेळा गर्भावस्थेतच सुरू होतो. त्यात अनेकदा त्यांचे आई-वडीलही असामाजिक कृत्ये करत असतात. मुले तो आदर्श मानतात. थोडक्यात, मूल परिस्थितीला त्याच्या कुवतीनुसार




सामोरे जाते, मग परिस्थिती त्याच्या कृत्यावर प्रतिक्रिया देते आणि मूल परत नव्या परिस्थितीला मूळ कलानुसार सामोरे जाते. हे दुष्टचक्र प्रौढावस्थेतही चालू रहाते. या वृत्तीचे एक कारण म्हणजे,'चूक' कायम 'दुसरा' करतो ही धारणा बालपणात असते, ती नंतरच्या अनुभवांनी अधिकाधिक घट्ट होते.

त्यात काही व्यक्तींवर 'गुन्हेगार', 'लफंगा','घाबरट', 'बुळचट' असे शिक्के तरुणपणी मारले जातात. मग समाज त्यांच्याकडे त्या चष्म्यातून पहात रहातो, भले, माणूस नंतर 'सरळ' मार्गावर आला असेल. त्या माणसाचा स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन, बऱ्याच जणांचा उर्वरित आयुष्याचा क्रम हे शिक्के बदलतात. त्या शिक्क्यामध्ये तो हिंसक असेल तर तो हिंसा चालू ठेवतो.

नव्या विचारात व्यक्तीच्या स्वभावात उत्तरायुष्यात बदल घडतात हे ओळखले आहे. आजवर हिंसेच्या शोधाचा रोख बहुधा 'बालपणात उत्तर शोधा ', 'स्त्री-पुरुष भेदांत उत्तर शोधा', 'धर्मात उत्तर शोधा' असा स्थावर असे. त्यामानाने हा वास्तववादी व गतिशील प्रयत्न दिसतो. त्यात जात, गरीबी यांसारख्या व्यवस्थात्मक कारणांनी व्यक्तीची जडण-घडण बदलते याची दखल घेतली आहे. कारण अशांमुळे माणसाच्या संधी मर्यादित होतात, त्याचे समाजाभिसरण मर्यादित होते.

व्यक्तीची वाढ कशी होते, सभोवताल बदलला तर वर्तणुकीत त्या त्या वेळी कसा फरक पडतो. हे या नव्या विचारात लक्षात घेतले जाते. यात सतत बदलणारी व्यक्तीच्या नजीकची परिस्थिती, त्या परिस्थितीत होणारे हिंसेचे बदल लक्षात घेतले जातात. या चढ-उतारांनुसार व्यक्ती हिंसेकडे वळते किंवा अहिंसेकडे वळते. असे प्रसंग व्यक्तीच्या आयुष्यात अनेकदा येतात. त्यामुळे व्यक्ती कधी हिंसक तर कधी अहिंसक होते. म्हणजे, हा विचार आपल्या पारंपारिक चिंतनाला छेद देतो. हिंसा-अहिंसा हे द्वंद्व नसते. त्यांचे नाते 'हे' विरुद्ध 'ते' असे नसते (गांधी). तो द्वंद्वात्मक प्रवास असतो. मानवी जीवनात दोन्हीची सतत रस्सीखेच चालू असते. ते जीवन वैयक्तिक असो किंवा सामूहिक - एक माणूस, त्याचा गोतावळा, त्याचे जातभाई, त्याचे शेजारी, त्याच्या धर्माचे लोक इथपासून देशाच्या पातळीपर्यंत हे द्वंद्व कायम चालू असते. हिंसा-अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कधी ही पुढे येईल, कधी दुसरी. व्यक्तीबाहेरचे प्रवाह कधी हिंसा करायला भाग पाडतात तर कधी अहिंसा. या प्रवाहांची समाजावर वर्चस्वासाठी कायम चुरस चालू असते. माणूस त्या वेळच्या परिस्थितीनुसार हिंसक किंवा अहिंसक बनतो.

याचा अर्थ व्यक्तीचे आजवरच्या आयुष्यात घडलेले व्यक्तिमत्त्व पुसले जाते असा नाही. त्या भूतकाळाचे ओझे असतेच पण तात्कालीन परिस्थितीची गतिमानता तो हिंसक होईल का अहिंसक हे ठरवायला तितकीच महत्त्वाची असते. घर, शाळा, कामाचे ठिकाण, धार्मिक संस्था या माणसाच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक सामूहिक सहभागात सरकार, पोलिस, कायदा, मीडिया पडद्यामागे का होईना, पण सतत हजर असतात. त्याने कोणत्या प्रकारचा परिणाम माणसावर होतो, त्यानुसार त्याची प्रतिक्रिया रहाते. उदा. या संस्था व व्यवस्था परात्मता, नकार, नामंजुरी, पोरकेपणा, संताप, शत्रुत्व, निष्कासन, लाज, अपमान, अवहेलना अशा नकारात्मक भावनांना खतपाणी घालत असतील तर माणसांचा, समूहांचा, राष्ट्रांचा परस्परसंवाद हिंसक होतो. त्याच जर सौहार्द, जिव्हाळा, माया, काळजी, सहानुभूती, सहकार, औदार्य, संलग्नता, कौतुक, आदर या अहिंसेला पोषक भावना असतील, तर परस्परसंवाद अहिंसक होतो. कोणती प्रक्रिया जास्त काळ टिकते; त्यावर माणूस, समूह, राष्ट्र यांची हिंसक का अहिंसक ही दिशा ठरते. उदा. लेख लिहिण्याच्या वेळी इस्राइल-पॅलेस्टाईन युद्ध भडकले आहे. प्रचंड विनाश चालू आहे. ही परिस्थिती हिंसेला पोषक आहे.

माहितीचा प्रसार, सोशल मीडिया आणि आर्थिक व्यवहार आज जागतिक स्तरावर अतिशय वेगाने चालू आहेत. ते जागतिक भांडवलशाहीला जशी मदत करतात तशीच जागतिक आतंकवादाला. त्याचे समाधानकारक उत्तर या प्रणालीत मिळत नाही. वैयक्तिक स्तरावर हे विश्लेषण जितक्या खोलात जाते, तितके ते संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक स्तरावर खोलात जात नाही.

(लेखाचा वरील बराचसा भाग प्रामुख्याने अनेक समाजशास्त्रज्ञांच्या, विशेषतः ग्रेग बराकच्या संशोधनावर आधारित

आहे. जास्तीचे मुद्दे पुढे पाहू.)

**हिंसेचा विस्तार**

एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, हिंसेचे प्रभावक्षेत्र. रशिया-युक्रेन युद्ध आता वर्षभराहून अधिक काळ चालू आहे, लेख लिहिण्याच्या वेळी वर उल्लेख केलेला इस्राएल- पॅलेस्टाईन युद्धाचा वणवा पेटला आहे. दोन्ही युद्धांचा त्या देशांवर आणि संलग्न क्षेत्रावर अनिष्ट परिणाम चालू आहे आणि होणार. अशा वेळी युद्धाची न्याय्य-अन्याय्यता हा प्रश्न या प्रमाणावरील युद्धात अप्रस्तुत ठरतो, तसेच, कोणत्या बाजूचे किती लोक दगावले, जखमी झाले हाही प्रश्न अप्रस्तुत ठरतो. ही प्रचंड हिंसा २१ व्या शतकातही चालू आहे आणि चालू रहाणार हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ही अर्थातच 'बाहेरची' दृश्य हिंसा आहे. व्यक्तिकेंद्रित कोणतीही सामाजिक विचारसरणी तिचे पुरेसे उत्तर देऊ शकत नाही कारण या हिंसेत साम्राज्यवाद, वंशद्वेष, अर्थकारण, पर्यावरणाची हानी (आफ्रिकेतील जमातींमधील युद्धे) असे इतर घटक गुंतलेले आहेत.

**शाब्दिक भाषा**

'शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा' हा इशारा सर्वश्रुत आहे. बहुधा आपण त्याचा वरवर अर्थ घेतो - शाब्दिक भाषेने कोणाला दुखवू नका. त्या जखमा एखाद्या खऱ्या शस्त्राइतक्याच, किंबहुना, प्रसंगी जास्तच घातक असतात. पण या वचनाचा हिंसेच्या अभ्यासात विचार करण्यासारखा आहे. माझे म्हणणे मी विशिष्ट शब्दांत मांडतो. जाणीवपूर्वक किंवा उत्स्फूर्तपणे शब्दांची निवड करतो. अनेक उपलब्ध शब्दांच्या ढिगाऱ्यातून एखाद-दुसराच 'उचित' शब्द निवडतो. हे निवडीचे 'स्वातंत्र्य' असते का सूक्ष्म स्तरावर हिंसेचे याचा विचार व्हायला हवा. कारण माझे सामाजिक स्थान, तद्नुषंगिक दृष्टिकोन माझी भाषा ठरवतात. विटगेनस्टाईन या तत्त्वज्ञाने शब्दकोशातील शब्दाचा अर्थ व आपल्याला अभिप्रेत असणारा, बोली भाषेत वापरल्या जाणाऱ्या त्याच शब्दाचा रोजचा अर्थ यांच्यातील अंतर स्पष्ट केले आहे. शब्दकोशातील शब्दांपेक्षा आपले बोली भाषेतील शब्द सैल असतात. कायद्याच्या संदर्भात हा प्रश्न गहन होतो. कायदा प्रत्येक शब्द निश्चित अर्थाने वापरतो. ती भाषा समाजाच्या मुख्य प्रवाहाची असते. अमेरिकेत जेव्हा गुलामगिरी होती तेव्हा कायद्यातील हा कृष्णवर्णीय लोकांना तुच्छ मानणारा पूर्वग्रह उघड होऊ लागला. ही बीजरूपातील हिंसा असते.

शब्द द्वैत माजवतो, असे एक वचन आहे (रामानुजाचार्य?). म्हणजे हे विरुद्ध ते ही सुप्त हिंसा त्यात असते. दुसरा मुद्दा म्हणजे, शाब्दिक भाषेची मर्यादा. ती पूर्वापारपासून चिंतकांनी ओळखली आहे. साधे दैनंदिन उदाहरण घ्यायचे झाले, तर मी काहीतरी बोलतो, ऐकणारा त्या शब्दांचा अर्थ त्याच्या त्या शब्दांच्या समजुतीने लावतो. समजा, मी म्हटले - कालचा सूर्यास्त सुंदर होता, ऐकणाऱ्यानेही तो सूर्यास्त पाहिलेला असतो आणि तो मला संमती देतो. पण त्याचा 'सुंदर' आणि माझा 'सुंदर' सारखे असण्याची शक्यता कमी असते. म्हणजे मतैक्य झाले, तरी संभाषणात दरी रहाते. ती दरी प्रसंगी हिंसेपर्यंत पोचू शकते.

म्हणून सगळ्याच धर्मात अनुभूती हे प्रमाण मानले असावे. शाब्दिक मार्गाने ज्ञान किंवा मोक्ष मिळणार नाही, साक्षात्कार होणार नाही. धर्म, सर्वोच्च ज्ञान, मोक्ष, साक्षात्कार या संकल्पनांवर विश्वास असो किंवा नसो, अनुभूतीपेक्षा भाषा दुय्यम दर्जाची असते हा मुद्दा ग्राह्य आहे, या भूमिकेचे एक कारण म्हणजे शब्दामध्ये हिंसा गर्भावस्थेत असते याची जाणीव हे असावे.

विचार शब्दबद्ध असतो, (अशाब्दिक भाषा निराळ्या स्तरावर असतात - संगीत, चित्रकला, नृत्य, इत्यादींची निर्मिती किंवा रसग्रहण. त्यांना सामान्यतः 'विचार' म्हटले जात नाही.) विचाराची अभिव्यक्ती शब्दामार्फत होते. विविध धर्मात, पंथात अगदी विपश्शनेपर्यंत मौनाचे महत्त्व आहे. मौनात काय 'विचार' करायचा, कोणते नामस्मरण करायचे हे त्याच चक्रात अडकवणारे आदेश ठरतात, हे लक्षात घ्यावे. पण शब्दापासून सुटका हे मौन मानले, तर आतली आणि पर्यायाने बाहेरची हिंसा शमवण्याचा तो मार्ग असावा. अतृणे पतितो वन्हि: स्वयमेवोपशाम्यति। (गवत नसलेल्या ठिकाणची आग तिची ती विझते.)

शाब्दिक अभिव्यक्ती कोणासमोर होते यावर हिंसेचे स्वरूप आणि परिमाण अवलंबून रहाते. दोन लोकांच्यातील संवाद ते राजकीय नेत्याची प्रचंड सभा. सभेतील हिंसेला प्रवृत्त करणारी भाषणे हा आता रोजच्या सार्वजनिक जीवनाचा भाग झालेला आहे. पण भाषेचा हा वरवरचा वापर झाला. मुळात भाषेचा उगम व त्याचे हिंसेशी नाते तपासण्यासारखे आहे.

**निरीक्षण**

एकूण सामाजिक शास्त्रे हिंसेचे समाधानकारक स्पष्टीकरण करू शकत नाहीत. संस्था आणि व्यवस्था यांच्याशी आपली जी देवघेव होते, त्यातील आपला वैयक्तिक अनुभव नकारात्मक असतो का सकारात्मक, त्यावर वर्धिष्णु सामाजिक हिंसेचे अंशतः उत्तर मिळते. कदाचित भाषा-हिंसा नात्याचा अभ्यास निराळा प्रकाश टाकू शकेल.

*पुरन्दरे चन्द्रशेखर, इंग्लंड*
*purandarearts.com*
*artnondeco@yahoo.co.uk*

❑

- no login required for dreams - [twitter (then), amazon, microsoft, इत्  यादींनी केलेली हत्  या]
स्  वप्  ने पहायला login ची जरूरी नाही.



- [man], swan and a machine -
how man killed the environment
हा हन्  त हन्  त नलर्नीं गज उज्  जहार।



- media and us

